Shri Shivaji Education Society, Amravati.

# Shri Shivaji College of Arts, Commerce and Science, Akola (MS)

NAAC Reaccredited with A Grade
(CGPA 3.24)
**College with Potential for Excellence**
Status by UGC
**Lead College** Status by SGB, Amravati University, Amravati.
DST **FIST Support**



**In Collaboration with**
**Dr. Panjabrao Deshmukh Krishi Vidyapeeth, Akola. (M.S.)**

**UGC Sponsored**
**National Conference**
**On**

# Contribution of Indian Thinkers and Literary Writers in Social Reforms (NCCSR-2019)

(An Interdisciplinary Approach)
**January 5th, 2019**

## CERTIFICATE

This is to certify that Mr./Mrs./Miss./Dr. प्रा. डॉ. व्ही. जी. वसु of डॉ. एच. एन. सिन्हा महाविद्यालय पातूर जि. अकोला. has Participated and Presented a paper tittle "राजर्षी शाहू महाराज एक थोर सामाजीक विचारवंत" at the National Conference on "Contribution of Indian Thinkers and Literary Writers in Social Reforms (NCCSR-2019)" on 5th January 2019. Organized by Faculty of Humanities and IQAC Shri Shivaji College of Arts, Commerce and Science, Akola (MS)

His or her paper has been included in the conference bearing the AJANTA -ISSN - 2277 - 5730 with 5.5 Impact Factor.

| | | |
|---|---|---|
| **Dr. Rameshwar M. Bhise** | **Dr. Kiran S. Khandare** | **Dr. Jiwan H. Pawar** |
| Principal | Convener | Organising Secretary |

VOLUME - VIII, ISSUE - 1 - JANUARY - MARCH - 2019
AJANTA - ISSN 2277 - 5730 - IMPACT FACTOR - 5.5 (www.sjifactor.com)

# ३०. राजर्षी शाहू महाराज एक थोर सामाजीक विचारवंत

प्रा. डॉ. व्ही. जी. वसु
डॉ. एच. एन. सिन्हा महाविद्यालय पातुर जि. अकोला.

**प्रस्तावना**

राजर्षी शाहू महाराजांचा जन्म जयसिंगराव ऊर्फ आबासाहेब घाडगे व राधाबाई यांच्या उदरी २६ जुन १८७४ रोजी झाला. शाहू महाराजांचे मुळ नाव यशवंत होते. कोल्हापूरचे चवथे राजे शिवाजी यांना इंग्रजांनी वेडसर ठरवून अहमदनगर जिल्ह्यात कैदेत ठेवले. तेथेच त्यांचा इंग्रजांच्या छळामुळे मृत्यु झाला. त्यांना पुत्र नसल्यामुळे कोल्हापूर संस्थान बालविण्याकरीता चवथे शिवाजी यांच्या पत्नी आनंदीबाई साहेब यांनी यशवंतरावास दत्तक घेतले. दत्तक विधानानंतर यशवंतराव हे शाहू महाराज म्हणून ओळखले जावू लागले. कोल्हापूरचे राज्य विशालगड, पन्हाळगड, पावनगड, भुदरगड, इ.डोंगरी किल्ल्यांनी वेढले आहे. तेथील गावकऱ्यावर राज्यांची सर्व भिस्त असे. त्यांची सत्ता वंशपरंपरेने चालत आली होती. दरबारची योग्य ती सेवाचाकरी करायची आणि बाकीच्या गोष्टी मनमानेल तशा अमलात आणण्याच्या असा त्यांचा सरजानी बाणा होता. बहुतेकजण आपल्या ताब्यातील मुलूखात राजासारखेच वागत. प्रजेच्या हिताची कदर करीत. काहीजण मात्र कस्पटासारखे लेखून तिचा छळ करीत. पण असे क्वचीतच घडत असे. कारण मुख्यसततेची त्यांच्यावर करडी नजर असे. २ एप्रील १८९४ रोजी वयाच्या २०व्या वर्षी कोल्हापूर संस्थानाची सुत्रे शाहू महाराजांनी आपल्या हाती घेतली. व कोल्हापूर संस्थानामध्ये वंशपरंपरेतील बरेचसे बदल घडवून आणून जणहिताची कार्ये केलीत. कोल्हापूरच्या प्रशासनात त्यावेळी इंग्रज व उच्चवर्णीयांचाच भरणा होता. शाहू महाराजांनी स्वतःच्या विश्वासातील लोक नेमले. कोर्टातील आठशे केसेसचा निकाल लावला. शेतकऱ्यांच्या अडीअडचणी जाणून घेतल्या. नवीन धरणे व शेतीच्या पाण्याची व्यवस्था केली. पेशवाईतील वेठबिगार पध्दत बद केली. औद्योगिक वसाहत स्थापन केली. १८९४ला कोल्हापूरमध्ये मुलींची पहिली शाळा काढली १८९६ला आलेल्या प्लेगच्या साथीमध्ये व दुष्काळात जनतेला मदत केली. स्वस्तधान्याची दुकाने सुरू केली. इत्यादीप्रकारची कामे समतावादी विचारसरणीचे पुरस्कर्ते शाहु महाराज यांनी केले.

**शाहू महाराजांचा आरक्षणविषयक दृष्टिकोन**

१९०२ मध्ये शाहू महाराजांनी नोकरीमध्ये आरक्षणाची तरतूद केली. या राजाज्ञेमुळे संस्थानात बराच गोंधळ निर्माण झाला. उच्चवर्णीय आणि तथाकथीत धर्मरक्षक समाज शाहूमहाराज यांच्या विरोधात तुटून पडला. या ठरावावर कोल्हापूरचा "समर्थ" आणि पुण्याचा "केसरी' यांनी जहरी टिका केली. नोकरीत आणि शिक्षणात ब्राम्हणेतर भरती केल्यामूळे त्यांचा अगदी जळफळाट झाला. इतकेच नव्हेतर ज्यांच्याकरिता राजाज्ञा होती असाही समाज शाहू महाराजाच्या राजाज्ञासंबंधी नापसंती व्यक्त करू लागला. उच्चशिक्षीत आणि सुसंस्कृत असा ब्राम्हणवर्गाला डावलून अठरापगड जातीच्या व्यक्तींना शासकीय नोकऱ्यामध्ये सामावून घेण्यासाठी काढलेली राजाज्ञा ही अन्यायकारक नाही का? असा युक्तीवाद सांगलीच्या अभ्यंकर वकीलांनी शाहुमहाराजांना भेटून आरक्षणाला विरोध केला शाहू महाराजांनी त्यांना उत्तर दिले नाही. शाहू महाराज उठले. त्यांना सर्वांना

घोडा घेण्याची आज्ञा केली. ते टांगा पटांगणात नेले. सेवकाला पागेतील ऐतखाऊ काम न करणारा आणि खाऊन माजलेला घोडा आणण्यास सांगितले. त्याच दररोज सकाळपासून संध्याकाळपर्यंत टांगा ओढणाऱ्या आणि सायंकाळी पोटाची खळगी भरू न शकणाऱ्या मरतुकड्या घोड्याशी पटांगणात आणण्याची आज्ञा शाहू महाराजांनी दिली. छत्रपती शाहूमहाराज यांच्या मनात काय आहे? ते काय करणार या उत्सुकतेपोटी पटांगण तुडुंब भरले होते. दोन्ही घोडे पटांगणात येताच, शाहू महाराजांनी चण्याचे भरलेले एक टोपले दोन्ही घोड्यांच्यासमोर ठेवण्यास सांगितले. ऐतखाऊ घोडा बलवान होता. टांग्याच्या घोड्याने चण्याच्या टोपलीला तोंड लावण्याचा प्रयत्न केल्यास ऐतखाऊ घोडा त्यास हाकलून लावी. पहाता पहाता ऐतखाऊ घोड्याने एकट्यानेच सर्वच्यासर्व चणे फस्त केले. एक चण्याचा दाणाही मरतुकड्या घोड्याला मिळाला नाही.

त्यानंतर शाहू महाराजांनी सेवकाला पुन्हा आज्ञा केली. दोन पिशव्यांमध्ये सारखे चणे आणण्यास सांगितले. व दोन्ही घोड्यांच्या तोंडाला एक एक पिशवी बांधण्याचे सांगितले. दोन्ही घोड्यांनी पिशवीतील चणे खाल्ले कोणताही वाद झाला नाही. मरतुकड्या घोड्यालादेखील चणेमिळाले. शाहू महाराजांनी प्रत्यक्ष जनतेसमोर हा प्रयोग करून दाखवीला. राखीव जागा जातीच्या आधारावर देण्याच्या राजाज्ञेविरुध्द उठवीलेला आवाज शांत झाला. आणि प्रथम कोल्हापूर संस्थानामध्ये जातीच्या आधारावर प्रशासनात नोकऱ्या देण्याचे तत्व मान्य करण्यात आले. नोकऱ्यांच्याबाबतीतसुध्दा तसेच आहे. विद्येची मक्तेदारी असलेला ब्राम्हण समाज पुढारलेला आहे. पण इतर समाज विद्येच्याबाबतीत मागे आहे. त्यांना शिक्षणाचा अधिकार दिला पाहीजे. आणि त्यांना विशेष सुविधा देवून आपल्याप्रमाणेच समान हक्क दिले पाहीजेत असे शाहू महाराजांचे मत होते.

**शाहू महाराजांनी आपल्या संस्थानामध्ये दिलेल्या आरक्षणाचे विवरण**

कोल्हापूर संस्थानाची लोकसंख्या ९ लक्ष त्यात पुढारलेल्या वर्गाची संख्या २६ हजार, दरबारात वरीष्ट नोकरीत ७१ जागापैकी ६० जागावर ब्राम्हणवर्गातील लोक होते. पुढील १२ वर्षात(१९१२)ते प्रमाणे ३५ इतके झाले. त्याचप्रमाणे खाजगीकडे ४६ ब्राम्हण व सात ब्राम्हणोत्तर अधिकारी होते.(१९००). १९२२ साली ब्राम्हण ४३ व ब्राम्हणोत्तर १०९ झाले. ब्राम्हणोत्तर कारकून १८९४ साली संबंध राज्यात फक्त १० होते. पुढे ती संख्या ५००पर्यंत गेली. वरील आकडेवारीवरून महाराजांनी ब्राम्हणाबरोबरच इतरही मागासवर्गीय जातींना नोकऱ्यामध्ये आरक्षण दिले हे दिसून येते. त्यादृष्टिने शाहू महाराजांनी २६ जूलै १९०२ रोजी संस्थानात यापूढे ज्या रिक्त जागा होतील त्याठिकाणी ५० टक्के जागा मागासलेल्या वर्गातील लोकांना दिल्या. त्याचप्रमाणे शैक्षणिक सवलतीही द्याव्यात यासंबंधी कार्ययोजना केली. तसेच हे करतांना प्रत्येक खात्याच्या मुख्यालयाने तिमाही अहवाल पाठवीला पाहिजे. यामध्ये हयगय करता येणार नाही. तसे करणाऱ्यावर कडक शासन करण्यात येईल असा आदेश काढला. जनतेच्या उत्साहाबरोबर तिच्या आकांक्षाही पुर्ण करणे चांगल्या राज्यकर्त्याचे लक्षण मानले जाते. छत्रपती शाहू महाराजांनी या उत्साहांचे जागृतीमध्ये रूपांतर करण्याचे ठरवीले.

**शाहू महाराजांचे शिक्षण आणि आरोग्यविषयक विचार**

शिक्षण आणि आरोग्य या जनतेच्या अत्यंत निकडीच्या गरजा होत. विशेषत: शिक्षणही सर्व सुधारणांची गुरूकिल्ली आहे. ही गोष्ट महाराजांच्या लक्षात आली. शिक्षणाशिवाय जनतेत निमाण झालेला उत्साह हा उथळ नदीच्या महापुरासारखा आहे. त्यात फायद्यापेक्षा तोटाच अधिक. माणसांचे आरोग्य किंवा सामाजिक कर्तव्ये याबाबतीत पाळावयाची पथ्ये फक्त जाणता माणूसच ओळखू शकतो. हे जाणतेपण फक्त शिक्षणानेच येते. म्हणून महाराजांनी आपला पहिला मोर्चा शिक्षणाकडे वळवीला.

त्यापूर्वी प्रयोग म्हणून कोल्हापूर व हातकणंगले येथे दोन रूग्णालये काढली. त्यामध्ये स्त्रियांसाठी एक खास विभाग सुरू केला. शाहूमहाराज यांनी शिक्षणाचे महत्व ओळखून कसल्याही प्रकारचा जातीभेद न करता विद्यार्थ्यांसाठी अनेक वसतीगृह सुरू के. १८९७साली त्यांनी प्रथम एक वस्तीगृह सुरू केले. १९०१ मध्ये जैन विद्यार्थ्यांसाठी एक वस्तीगृह सुरू केले. १९०२ मध्ये शाहू महाराज विलायतेत जाऊन आले. तेव्हा मुस्लीम बांधवानी त्यांचा सत्कार केला. त्याचवेळी मुस्लीम विद्यार्थ्यासाठी वस्तीगृह काढण्याचे आश्वासन त्यांनी दिले. याच आंधारावर १९०७ मध्ये मुस्लीम विद्यार्थ्यांसाठी वस्तीगृह सुरू करण्याचे धाडस शाहूमहाराजांनी केले. तसेच अनेक जातीधर्मासाठी वस्तीगृहांची स्थापना करून अनेक विद्यार्थ्यांना त्यामध्ये प्रवेश दिला. तसेच एकाच वस्तीगृहामध्ये सर्व जातीधर्मांची मुले रहावीत. यासाठीसुध्दा शाहू महाराजांनी प्रयत्न करून त्यांना आर्थिक मदत केली.

महाराजांच्या दत्तक मातोश्री आनंदीबाई हया १४ सप्टेंबर १९०२ला मृत्यू पावल्या. अंत्यविधी करण्याकरीता महारात आपणास बोलावतील अशी राजोपाध्यास फार आशा होती. त्याप्रमाणे महाराजांनी बोलावीलेही. परंतू विधी वेदोप्त झाला पाहीजे अशी त्यांनी अट घातली. तरीसुध्दा महाराजांनी त्यांच्याप्रमाणे वेदोप्त न करता जोशीरावांच्या मंत्रानी आईचा अंतविधी केला. त्याचवेळी पुरोगामी विचारसरणीच्या मंडळींनी त्यांच्या घराला आग लावली. अशाप्रकारे महाराजांवर जुलूम झाले. तरीसुध्दा ते न डगमगता, जातीयवाद न मानता समतावादी दृष्टीकोणातून त्यांनी प्रयत्न केले. १९०२ मध्ये जातीयवाद नष्ट करण्याच्या दृष्टिकोनातून कोजागीरी पोर्णिमेच्या निमीत्ताने वेदाप्रमाणे विधी करण्यास ब्राम्हणांना न बोलाविता शुद्रांना बोलावून विधी करून घेतला. यावर महाराजांवर बरीच टिका झाली. तरीसुध्दा ते डगमगले नाही.

राजर्षी शाहू महाराज यांना सनातन प्रवृत्ती मान्य नव्हती. देवस्थानावर होणारा खर्च हा जनतेच्या करातून केला जातो. हाच खर्च सर्वसामान्यांच्या शिक्षणावर केला गेला पाहिजे. याकारणावरून त्यांनी गावोगावी प्राथमीक शाळा काढल्या. तसेच २१ नोव्हेंबर १९१७ रोजी प्राथमीक शिक्षण सक्तीचे केले. हे शिक्षण समाजातील सर्वच स्तरातील जलोकांना मिळाले पाहिजे यासंदर्भात कायदे केले. त्यामध्ये १९१९ मध्ये अस्पृययासाठीची वेगळी शाळा बंद करून स्पृश्यांच्या शाळेत प्रवेश देण्याचा कायदा केला, १९१८ मध्ये कुलकर्णी वतने रद्द केली, निपानी येथे समतेचे शिक्षण मिळण्यासाठी डेक्कन रयत संस्थेची स्थापना केली.

**शाहू महाराजांचे समतावादी विचार**

भारतीय संविधाननिर्मात्यांनी छत्रपती शाहू महाराज यांचे आरक्षणाचे तत्व संविधानाच्या, माध्यमाने प्रत्यक्षात उतरवीले. भारतीय संविधान समता, स्वातंत्र्य, न्याय या तत्वावर लोकशाही राज्य निर्माण करू पाहते. त्यामध्ये जात, धर्म, पंथ, लिंग, वंश, या तत्वावर कसल्याही प्रकारचा भेदाभेद करता येणार नाही. असे स्पष्ट केले आहे. त्याचप्रमाणे संविधानाच्या भाग तीनमध्ये कलम १२ ते ३५च्या नुसार नागरीकांना मुलभुत अधिकार दिले त्यामध्ये समतेचा अधिकार, स्वातंत्राचा अधिकार, शोषणाविरूध्दचा अधिकार, धर्मस्वातंत्र्याचा अधिकार, संस्कृती आणि शिक्षणविषयक अधिकार आणि घटनात्मक उपाययोजना व अधिकार हे व्यक्तीविकासाचे प्रमुख अधिकार आहेत.

शाहूमहाराजांची ही सर्व कायदे भारतीय संविधानात आहेत १४ वर्षापर्यंतच्या आपल्या मुलांना शिकवीले पाहीजे. हे मौलीक कर्तव्यामध्ये नमुद आहे, भारतीय संविधानाच्या अनुच्छेद १५मध्ये भेदाभेद करता येणार नाही. अनुच्छेद २६नूसार भारतीय नागरीकांना नोकऱ्यामध्ये समानसंधी देण्यात आली. अनुच्छेद २१ नुसार जीवीताचा अधिकार देण्यात आला, अनुच्छेद १७नूसार अस्पृश्यता नष्ट करण्यात आली. अनुच्छेद १८ नुसार ज्या पदव्यामुळे आर्थिक लाभ होतो अशा खानबहादुर,

राजसत्तेत, कुलकर्णी ह प्रकारच्या पदव्या नष्ट करण्यात आल्या. त्याचप्रमाणे कलम ३३० ते ३४२ नुसार प्रशासकीय नोकऱ्यामध्ये आरक्षणाची व्यवस्था केली आहे. विधीमंडळ व संसदेमध्ये राखीव जागांची तरतूद केली आहे. तसेच मागासलेल्या [illegible] नष्ट करण्यासाठी संविधानामध्ये कलम ३३५ आणि ३४० समाविष्ठ करून मागासवर्गीयांचे आर्थिक कायदेकानुन करण्याची जबाबदारी राज्यावर टाकण्यात आली आहे. मागासवर्गीयांचे मागासलेपण घालवीण्यासाठी भेदाभेद करण्याची अनुमती भारतीय संविधानाने दिली आहे. ती समता प्रस्थापित करण्यासाठी. त्यामुळे "आरक्षणतत्व' घटना समत ठरते. घटनाबाह्य ठरत नाही.

**निष्कर्ष**

छत्रपती शाहू महाराज हे कोल्हापूर संस्थानचे राजे होते. त्याकाळी सर्व संस्थानामध्ये ब्राम्हणशाही व्यवस्था टिकून [illegible] होती. शाहू महाराज हे समतावादी विचाराचे पुरस्कर्ते होते. त्यामुळे त्यांनी वंशपरंपरागत विचाराला तडा देवून समाजवादी कार्ये केली. १९०२मध्ये शाहू महाराजांनी नोकरीमध्ये आरक्षणाची तरतूद केली. या राजाज्ञेमुळे संस्थानात बराच गोंधळ निर्माण झाला. उच्चवर्णीयआणि तथाकथीत धर्मरक्षक समाज शाहूमहाराज यांच्या विरोधात तुटून पडला. या ठरावावर कोल्हापूरचा "समर्थ" आणि पुण्याचा "केसरी' यांनी जहरी टिका केली. नोकरीत आणि शिक्षणात ब्राम्हणेत्तर भरतीकेल्यामुळे त्यांचा अगदी जळफळाट झाला. इतकेच नव्हेतर ज्यांच्याकरिता राजाज्ञा होती असाही समाज शाहूमहाराजाच्या राजाज्ञासंबंधी नापसंती व्यक्त करू लागला. उच्चशिक्षीत आणि सुसंस्कृत अशा ब्राम्हणवर्गाला डावलून अठरापगड जातीच्या व्यक्तींना शासकीय नोकऱ्यामध्ये समान संधी दिली. तसेच राजर्षी शाहू महाराज यांना सनातन प्रवृत्ती मान्य नव्हती. देवस्थानावर होणारा खर्च हा जनतेच्या करातून केला जातो. हाच खर्च सर्वसामान्यांच्या शिक्षणावर केला गेला पाहिजे. याकारणावरून त्यांनी गावोगावी प्राथमीक शाळा काढल्या. तसेच २१ नोव्हेंबर १९१७ रोजी प्राथमीक शिक्षण सक्तीचे व मो. हे शिक्षण समाजातील सर्वच स्तरातील लोकांना मिळाले पाहिजे यासंदर्भात कायदे केले. शाहूमहाराज यांनी शिक्षणाचे महत्त्व ओळखून कसल्याही प्रकारचा जातीभेद समाजातील सर्वच स्तरातील लोकांना मिळाले पाहिजे यासंदर्भात कायदे केले.

भारतीय संविधानाच्या माध्यमातुन छत्रपती शाहू महाराज यांचे आरक्षणाचे तत्व प्रत्यक्षात उतरले. भारतीय संविधान समता, स्वातंत्र, न्याय या तत्वावर लोकशाही राज्य निर्माण करू पाहते. त्यामध्ये जात, धर्म, पंथ, लिंग, वंश, या तत्वावर कसल्याही प्रकारचा भेदाभेद करता येणार नाही. असे स्पष्ट केले आहे. त्याचप्रमाणे संविधानाच्या भाग तीनमध्ये कलम १२ ते ३५ च्यानूसार नागरीकांना मुलभुत अधिकार दिले.

थोडक्यात राजर्षी शाहू महाराजांचे आरक्षण भारतीय संविधानाने पूर्ण केले. व शाहू महाराजांना समाजात अपेक्षीत असलेली समता संविधानाने पूर्ण केली.

**संदर्भ सूची**

१. पवार डॉ. जयसिंगराव, राजर्षी शाहू स्मारक ग्रंथ.
२. किर धनंजय, लोकराजा शाहू महाराज व्यक्तीत्व आणि विचार.
३. घोरपडे एकनाथ केशव, कोल्हापूरचे शाहू छत्रपती (चरित्र व कार्य).
४. मोरे गिरीश, राजर्षी शाहू विचार व कार्य.
५. पवार डॉ. जयसिंगराव, राजर्षी शाहू छत्रपती जीवन व कार्य.